# साखळी पध्दतीने सिमेंट नाला बांध बांधण्याचा कार्यक्रम
# सन 2012-13 व सन2013-14(शा.नि.दि.25 एप्रिल 2013)
# मार्गदर्शक सुचना

..............................................

**<u>प्रस्तावना</u>**

राज्यातील पाण्याची उपलब्धता व वारंवार येणारी दुष्काळ सदृश्य परिस्थिती विचारात घेता जलसंधारण कार्यक्रमाला अनन्य साधारण महत्व प्राप्त झालेले आहे. राज्यातील शेतीसाठी संरक्षित जल सिंचनाची साधने निर्माण करणे, जमिनीची प्रचंड प्रमाणात होणारी धूप थांबविणे, तसेच पडीक जमिनीचा विकास करुन ग्रामीण भागातील उत्पन्नाची व उत्पादनाची साधने वाढविणे या करीता जल संधारणाचा कार्यक्रम राज्यात विविध योजनांव्दारे राबविण्यात येत आहे.

राज्यातील जवळजवळ 80 टक्के क्षेत्र कोरडवाहू तर 52 टक्के क्षेत्र हे अवर्षण प्रवण क्षेत्रात येते. सन 2006-07 पासून विदर्भातील आत्महत्याग्रस्त 6 जिल्हयामध्ये मा. पंतप्रधान पॅकेज अंतर्गत चेकडॅमचा कार्यक्रम राबविण्यात आला आहे. राष्ट्रीय कृषी विकास योजनेतून सन 2011-12 मध्ये 63 तालुक्यात,सन 2012-13 मध्ये 62 तालुक्यात व सन 2012-13 मध्ये राज्य योजनेतून 15 तालुक्यात सिमेंट बंधारे बांधण्याचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तसेच विदर्भातील 8 जिल्ह्यात विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम राबविण्यात येत आहे. विदर्भ सघन सिंचन विकासकार्यक्रमामध्ये साखळी पध्दतीने सिमेंट बंधारे हा उपचार समाविष्ट आहे. त्यासाठी 5 वर्षात रु.468.00 कोटीनिधी उपलब्ध होणार असून विदर्भातील 8 जिल्हयातील 77 तालुक्यात साखळी पध्दतीने सिमेंट नाला बांध बांधण्यात येणार आहेत. राज्यातील दुष्काळ सदृश्य परिस्थितीतील दिनांक31 मार्च, 2013 रोजी 1825 गावात टँकरने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरु आहे. अशा गावामध्ये शासन निर्णय दि.25 एप्रिल, 2013 अन्वये रु.187.7925 कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

**<u>योजनेचेउद्देश</u>**

पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत बळकट करणे,पावसाचे पाणी अडविणे. भु गर्भातील पाण्याचे पुनर्भरण करणे, खरीपव रब्बी पिकांना संरक्षित सिंचनाची सोय उपलब्ध करुन देणे,सुपीक जमीन धरणात वाहुन जाण्यास प्रति रोधकरणे ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी निर्माण करणे.

**<u>गाव निवडीची कार्य पध्दती</u>**

**या कार्यक्रमासाठी गावे निवडताना खालील प्रमाणे प्राध्यान्यक्रम विचारात घ्यावा.**

1) टँकरने पाणी पुरवठा पाणलोटातील 50% कामे पूर्ण.

2) टँकरने पाणी पुरवठा पाणलोटातील 25% ते 50% कामे पूर्ण.

3) टँकरने पाणी पुरवठा एकात्मिक पाणलोट क्षेत्र व्यवस्थान कार्यक्रम IWMP मध्ये समाविष्ट गावे

4) टँकरने पाणी पुरवठा RIDF नाबार्ड अर्थ सहाय्यित मेगा पाणलोट विकास मध्ये समाविष्ट गावे.

5) या वर्षी टँकरने पाणी पुरवठा होणारे गाव

**जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षते खालील समीती गावांची निवड करील.**

1) जिल्हाधिकारी :- अध्यक्ष

2) मुख्य कार्यकारी अधिकारी :-सह अध्यक्ष

3) वरिष्ठ भु वैज्ञानिक :- सदस्य

4) कार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे (स्था.स्तर) :- सदस्य (जिथे प्रकल्प कार्यान्वयीत यंत्रणा लघुपाट बंधारे असेल तिथे सदस्य सचिव)

5) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी :- सदस्य (जिथे प्रकल्प कार्यान्वयीत यंत्रणा कृषी विभाग असेल त्या ठिकाणी सदस्य सचिव)

**<u>योजनेचा कालावधी -</u>**

शासन निर्णयक्र.जलस/2013 / प्रक्र 63 / जल-7 दि.30 मार्च 2013 अन्वये सन 2012-13 साठी मंजूर करण्यात आलेल्या निधीतून माहे जून, 2013 अखेर सिमेंट नाला बांधाची कामे करून खर्च करण्यात यावा. शासन निर्णय क्र.असक- 2013 / प्रक्र-15 / जल-11 / दि.9 एप्रिल, 2013 अन्वये सन 2013-14 साठी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

**अंमलबजावणीची कार्य पध्दती -**

या कार्यक्रमाच्या तात्काळ दृश्य परीणामासाठी साखळी पध्दतीने (Series) सिमेंट नाला बांध घेणे अनिवार्य आहे.एका साखळीत कमीत कमी 3 सिमेंट नाला बांध असावेत. इतर योजनेतुन नाल्यावर काही सिमेंट नाला बांधझाले असतील, तर उर्वरीत सिमेंट नाला बाधांची कामे या योजनेत घ्यावीत. त्यामुळे साखळी मध्ये किमान 3 बांध निर्माण होतील.

निवड केलेल्या गावा मध्ये नाल्यांची संख्या ठरवुन त्यास साखळी क्रमांक देण्यात येऊन साखळी क्रमांक निहाय प्रस्तावित सिनांबा संख्या इ. तपशीलासह गाव नकाशाव सविस्तर माहिती प्रपत्र अ व ब सह आयुक्तालयास सादर करण्यात यावी.

दि. 25/04 / 2013 च्या शासन निर्णया नुसार अंतिम निवड करण्यात आलेल्या गावामध्ये सिमेंट नाला बांधाचीकामे करण्यात यावीत तसेच ही कामे फक्त संधानकात (कॉक्रीट पध्दतीने) करण्यात यावीत. सदरची कामे करण्या करीता अंमलबजावणी यंत्रणा कृषि विभागव लघु पाटबंधारे (स्थानिकस्तर) राहिल शासनाचे पत्र क्रं. जलसं.2013/प्रक्रं.61/जल-7 दि.4 मे 2013 अन्वये तालुका निहाय यंत्रणा निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

चेकडॅमची कामे ही स्वतंत्र घेण्या ऐवजी ती एकाच नाल्यावर साखळी पध्दतीने घेण्यात यावीत, व त्यासएकत्रित पणे मंजूरी देण्यात यावी जेणे करून त्यांचा एकत्रीत परिणाम दिसून येईल आणि त्यात गाळ साचण्याचेप्रमाण ही कमी राहील. तसेच या बांधामध्ये गाळ साचू नये म्हणून शेतक-यांना नाल्यास संमांतर व शेताच्याकडेने मातीचे लहान लहान बांध बांधण्यास प्रवृत्त करावे, जेणे करुन शेतातीलमाती पाण्या बरोबर नाला प्रवाहात येणार नाही. नाला बांधाची जी साखळी तयार होणार आहे. त्यातील पहिल्याबांधाच्या वरील बाजूस खात्याच्या इतर उपलब्ध अनूदानातून ( उदा. अनूशेष, डीपीडीसी, राज्यस्तर इ.) गॅबीयन स्ट्रक्चरचे काम हाती घेण्यात यावे, जेणे करून बांधात गाळ साचणार नाही.

सिमेंट नाला बांधाच्या कामासाठी तांत्रिक मार्गदर्शक सुचना, आर्थिक मापदंड तसेच तांत्रिक व प्रशासकीय मान्यता खात्याच्या प्रचलित नियमानुसार असेल. चेकडॅम बांधणेसाठी

जागेची निवड उप विभागीय कृषिअधिकारी यांनी करणे बंधनकारक आहे. जागेची निवड करीत असताना चेकडॅमुळे ज्या शेतक-यांना फायदा होणार आहे अशा शेतक-यांनी समक्ष जागा निवडीच्या वेळी उपस्थित रहाणे अनिवार्य आहे, जेणे करुन भविष्यात शेतक-यांच्या तक्रारी राहणार नाहीत.

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी याबाबत सर्व संबंधिताची स्वतंत्र सभा घेऊन गावांची निवड करण्याबाबत संबंधितांना मार्गदर्शन करावे.या योजनेचा कालावधी कमी असलेने गावांची निवड तातडीने पुर्ण करावी. गावाची निवड पुर्ण झाले नंतर गावामध्ये बांधावयाच्या नाला बांधाची जागा निवड करणे, त्याचे सर्वेक्षण करणे, अंदाजपत्रके तयार करुन त्यास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्रदान करणे, प्रत्यक्ष कामाचा नियोजन बध्दआराखडा तयार करुन विहित मुदतीत कामे पुर्ण करावीत. सिमेंट नाला बांधाच्या कामाची गुणवत्ता अत्यंत उत्कृष्ट राहिल यासाठी क्षेत्रिय अधिकारी / कर्मचारी यांनी सर्व तोपरी दक्षता घ्यावी.

सदरचे सिमेंट नाला बांधाची कामे सिमेंट कॉंक्रीट मध्ये करावयाची आहेत . कामे करण्यासाठी बी-1 निवीदा पध्दतीचा अवलंब करण्यात यावा.यासाठी लघु पाटबंधारे विभाग ज्या कार्य पध्दतीचा अवलंब करतो,त्या कार्य पध्दतीचा अवलंब करुन, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी बी-1 निवीदा त्यांचे स्तरावर काढण्यात याव्यात. सदरच्या कामासाठी लघु पाटबंधारे विभाग वापरत असलेली जलसंपदा विभागाची प्रादेशिक दर सुची आपल्या विभागासाठी त्या त्या प्रादेशिक विभागाची वापरण्यात यावी.

**योजनेमध्ये समाविष्ट जिल्हे:-**

योजनेमध्ये समाविष्ट जिल्हे व तालुके यांची माहिती सोबतच्या प्रपत्र- क मध्ये दर्शविली आहे.

निधीचे वितरण:-

योजने अंतर्गत निधीचे वितरण कृषि आयुक्तालय स्तरावरुन दि.30 मार्च-2013 अन्वये प्राप्त झालेला निधी आर.टी.जी.एस.व्दारे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,यांचे स्तरा वरील बँक खात्यात जमा करण्यात येईल. दि.4 / 5 / 2013 च्याशासन पत्रानुसार ज्या तालुक्यासाठी कृषि विभाग अंमलबजावणी यंत्रणा असेल त्या तालुका कृषि अधिकारी यांचे बँक

खाती आर.टी.जी.एस.व्दारे निधी वितरीत करावा.तसेच या कार्यक्रमासाठी लघु पाटबंधारे (स्थानिकस्तर) विभाग ज्या तालुक्यासाठी अंमलबजावणी यंत्रणा असेल त्या तालुक्यांचा निधी आर टी जी एसव्दारे संबंधीत अधिक्षक अभियंता लघु पाटबंधारे (स्थानिकस्तर) विभागाकडे आयुक्तालय स्तरावरुन वितरीत करण्यात येईल. अधिक्षक अभियंता लघु पाटबंधारे (स्थानिकस्तर) हेत्यांचेविभागाच्या

कार्यप्रणाली नुसार संबंधित तालुक्यास निधी वितरीत करतील. दि. 25 / 4 /2013 चे शासन निर्णया नुसार सन 2013 -14 साठी मागणी क्र. जल 7, 4402 मृद व जल संधारण या वरील भांडवली खर्च,102 मृद संधारण, (01) राज्य योजना पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (01) (23) सिमेंट बांध (चेकडॅम) कार्यक्रम (राज्यस्तर) दत्तमतं (44022411) 53 मोठी बांधकामयालेखाशिर्षा खाली निधी मंजूर झाला असून त्याचे वितरणवर नमूद केल्या प्रमाणे बी डी एस (संगणक प्रणाली) व्दारे करण्यात येईल.

**लाभ दयावयाचे लाभार्थी:-**

चेकडॅमच्या जवळपास जमिनी असलेले अल्प व अत्यल्प भू धारक, अनुसूचित जाती / जमाती व इतर शेतकरी यांचा उपभोक्ता गट म्हणून निवड करावी.हा उपभोक्ता गट या चेकडॅमची देखभाल व दुरुस्ती करेल.

योजना राबविण्यात येणा-या गावाचे पाया भूत सर्व्हेक्षण करणे:-

सदरचा कार्यक्रम राबविणेसाठी निवडण्यात आलेल्या गावाचे पाया भूत सर्व्हेक्षण करणे आवश्यक असून सदरचे सर्व्हेक्षण सोबत दिलेल्या प्रपत्र - ब मध्ये करण्यात यावे.

कामाची तपासणी:-

कामाची गुणवत्ता उत्कृष्ट राहील या हेतूने कामे चालू असताना व पूर्ण झालेल्या कामांची तपासणी करणे आवश्यक आहे. तालुका कृषि अधिकारी यांनी 100 टक्के व उपविभागीय कृषि अधिकारी यांनी 20 टक्के कामाची तपासणी करावी. तसेच जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी कार्यक्रमांतर्गत बांधण्यात आलेल्या सिमेंटनाला बांधा पैकी 10 टक्के नाला बांधाची तपासणी करणे अनिवार्य राहील. विभागीय कृषि सह संचालक यांनी

विभागांतर्गत पूर्ण झालेल्या एकुण सिमेंट नाला बांधा पैकी 2 टक्के तपासणी करणे आवश्यक राहील. आर्थिक तपासणी विहित करण्यात आलेल्या मापदंडानुसार करण्यात यावी.

**योजनेचेमुल्य मापन:-**

योजने अंतर्गत हाती घेतलेली कामे पुर्ण झाल्या नंतर त्या गावाचे खालील निकषाचे आधारे त्रयस्थ संस्थे कडून मुल्यमापन करण्यात येईल.

**मुल्य मापनासाठीचे निकष-**

1.सिंचन क्षेत्रात झालेली वाढ

2.भु गर्भातील पाणी पातळी

3.पिक उत्पादनात झालेली वाढ

4.पिक रचनेत झालेला बदल

5.रोजगाराच्या निर्माण झालेल्या संधी

6.शेतक-यांच्या उत्पन्नात झालेली वाढ

7. इतर अ प्रत्यक्ष झालेले फायदे

**योजनेचे सनियंत्रण व अहवाल सादरीकरण**

योजने अंतर्गत झालेल्या कामाचे सनियंत्रण तालुकास्तर, उपविभागस्तर, जिल्हास्तर, विभागस्तरव आयुक्तालय स्तरावर करण्यात येईल. योजने अंतर्गत झालेल्या प्रगतीचा आढावा दर महा घेण्यात यावा. योजने अंतर्गत झालेल्या कामाचा प्रगति अहवाल कृषि आयुक्तालया सदर महिन्याच्या 8, 15, 22, 30 तारखे पर्यतप्रपत्र - ड मध्ये सादर करण्यात यावा . सदरचा अहवाल विहित मुदतीत ई मेलव्दारे पाठविण्यात यावा. तसेच अहवाला ची हार्ड कॉपी ही पाठविण्यात यावी.

स्वाक्षरीत/-

**आयुक्त कृषि**

**महाराष्ट्र राज्य**

**पुणे- 411001.**

---

जा.क्र.साखळी72ता/चेकडॅम/1160/मृद-1/13

मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन,

कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,

पुणे411001. दिनांक:- 21 मे, 2013.

प्रति,

1) मुख्य अभियंता लघू पाटबंधारे विभाग (स्था.स्तर) येरवडा, पुणे

2) विभागीय कृषि सह संचालक- पुणे, औरंगाबाद, लातुर, नाशिक, कोल्हापूर.

3) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी- पुणे, अहमदनगर, सोलापूर, नाशिक, जळगाव, सातारा, औरंगाबाद, बीड, जालना, नांदेड, उस्मानाबाद व लातूर

4. अधिक्षक अभियंता लघू पाटबंधारे विभाग (स्था.स्तर), पुणे , नाशिक व औरंगाबाद

## प्रपत्र-अ

| अ.क्र | जिल्हा | तालुका | निवडलेल्या गावांचे नांव | गावातील एकुण साखळीसंख्या | बांधावयाच्या चेकडॅमची संख्या | आवश्यक अंदाजपत्रकीय निधी (रु.लाख) | गाव निवडीची कार्य पध्दती मधील निवडीचा निकष (1 ते 5 पैकी) देण्यात यावा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

**प्रपत्र-ब**

**चेकडॅम बांधणेसाठी निवड केलेल्या गावाचे पाया भूत सर्व्हेक्षण**

गावाचेनांव ----------तालुका-----------जिल्हा-----------

1) गावाचे भौगालिक क्षेत्र (हे.)-

2) समाविष्ट पाणलोटाची नांवे व क्रमांक- पाणलोटांची पूर्णत्व%

3) सरासरी पर्जन्यमान (मी.मी.)-

4) एकूण शेतकरी कुटुंबाची संख्या-

अ) अल्प भू धारक शेतकरी-

ब) अत्यल्प भू धारक शेतकरी-

क) अनुसूचित जाती /जमाती शेतकरी-

ड) इतर शेतकरी-

5) विहीरींची संख्या - बोअरवेल ची संख्या-

6) विहीरीतील पाण्याची पातळी (मे महिन्यातील )---- मीटर

7) मुख्य पिकाखालील क्षेत्र (हे.) व उत्पादकता (कि.ग्रॅम प्रती हे.)

| अ.क्र. | पिकाचेनाव | क्षेत्र | उत्पादकता |
|---|---|---|---|
| अ) | खरीपहंगाम | | |
| 1 | | | हंगाम |
| 2 | | | |
| ब) | रब्बीहंगाम | | |
| 1 | | | |
| 2 | | | |
| 3 | | | |

8) या पूर्वी गावात विविध योजने अंतर्गत बांधण्यात आलेल्या सिमेंट नाला बांधची संख्या व एकूण पाणीसाठा(टीसीएम

9) कार्यक्रमात निवड केलेल्या नाल्याचे नांव व प्रस्तावित नाला बांधाची संख्य

| अ. क्र. | नाल्याचे नाव(स्थानिक नाव) | प्रस्तावितना लाबांधाची संख्या | सर्व्हे नंबर | प्रस्तावित नाला बांधाची रक्कम रुपये लाख | प्रस्तावित नाला बांधामुळे तयार होणारा पाणीसाठा (टीसीएम) |
|---|---|---|---|---|---|

10) प्रमाणपत्र- प्रमाणित करण्यात येते की, सदर प्रस्तावित सि.ना.बां.ची कामे इतर कोणत्या ही योजनेतसमाविष्ट / प्रस्तावित नाहीत.पाणलोटातील पर्जन्यानुसार उपलब्धअपधा व असल्यामुळे सदरची कामे प्रस्तावित केल्याची खात्री केली आहे.

11) प्रस्तावित बांधामुळे होणारे हंगामी बागायत क्षेत्र.....हेक्टर

1) गावातील इतर महत्तवाची माहिती-

**दिनांक** **स्वाक्षरी**

**तालुकाकृषिअधिकारी**

**प्रपत्र- क**

**योजनेमध्ये समविष्ट जिल्हे व तालुके**

| **अ.क्र.** | **जिल्हा** | **तालुका व गावे संख्या कंसात** | **एकुण गावे संख्या** |
|---|---|---|---|
| 1 | अहमदनगर(6) | नेवासा (11),पाथर्डी (45), जामखेड (36) , श्रीगोंदा (21),रहाता(9),कोपरगाव(6) | 128 |
| 2 | औरंगाबाद(4) | कन्न्ड(14),पैठण(66),खुलताबाद(8),सोयगाव(6) | 94 |
| 3 | बीड(5) | बीड(5),गेवराई(40),पाटोदा(31),माजलगाव(6), केज(8),वडवणी(5) | 90 |
| 4 | जळगांव(3) | जळगाव(9),जामनेर(42),पारोळा10) | 61 |
| 5 | जालना(4) | अंबड(42), बदनापूर (34), मंठा (5),घनसावंगी (48) | 129 |
| 6 | लातूर(4) | औसा (42),निलंगा (15),लातूर (33),शिरुर (अनंतपाळ) (6) | 78 |
| 7 | नांदेड(2) | कंधार(12),नायगाव(6) | 18 |
| 8 | नाशिक(3) | मालेगाव(7),येवला(23),बागलाणा(21), | 51 |
| 9 | उस्मानाबाद(3) | कळंब(20),उस्मानाबाद(8),वाशी(9), | 37 |
| 10 | पुणे(3) | आंबेगाव(6),खेड(5),शिरुर(8) | 19 |
| 11 | सातारा(1) | कोरेगाव(40), | 40 |
| 12 | सोलापूर(4) | बार्शी(13),माढा(51),मोहोळ(37),माळशिरस(10) | 111 |
| | 42 | 42 | 856 |
| **अ.क्र.** | **जिल्हा** | **लघु पाटबंधारे (स्थानिकस्थर) विभाग** | **एकुण गावे संख्या** |
| 1 | अहमदनगर(3) | अहमदनगर(38),शेवगांव(30),कर्जत(61) | 129 |
| 2 | औरंगाबाद(5) | औरंगाबाद(59),गंगापूर(28),वैजापूर(29),फुलब्री(40), सिल्लोड(48) | 204 |
| 3 | बीड(3) | आष्टी(102),बीड(73),?शिरुर(22) | 197 |
| 4 | जालना(3) | जाफ्राबाद(33),जालना(51),भोकरदन(47) | 131 |
| 5 | नांदेड(1) | लोहा(24) | 24 |
| 6 | नाशिक(5) | नांदगाव(39,सिन्नर(21),चांदवड(11),देवळा(10),सुरगप्पा(12) | 93 |
| 7 | उस्मानाबाद(3) | परांडा(6),तुळजापूर(22),उमरगा(13 | 41 |
| 8 | पुणे(2) | बारामती(12),इंदापूर(13), | 25 |
| 9 | सातारा(1) | फलटण(18) | 18 |
| 10 | सोलापूर(4) | करमाळा ( 59, दक्षिण सोलापूर (8), उत्त्र सोलापूर(13), | 107 |
| | **एकुण- 30** | **30** | **969** |

# प्रपत्र-ड

राज्यस्तर निधीतून साखळी पध्द्तीने सिमेंट नाला बांध बांधाचा कार्यक्रम

(72तालुके कार्यक्रम ) 2013-14

साप्ताहिक प्रगति अहवाल दि.//2013अखेर

(रू.लाखात)

| जिल्हा | तालुका | निवडलेली गावेसंख्या | प्रस्तावित कार्यक्रम सि.ना.बां संख्या | अंदाज पत्रकीय रक्कम | शा.नि. नुसार वितरीत निधी | सप्ताहातील प्रगती | | | प्रागतिक कामे व खर्च | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | चालू कामे | पूर्ण सि.ना.बां. | खर्च | चालू कामे | पूर्ण सि.ना.बां. | खर्च | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |